# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३४४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०६/०७/२०१८

**१) तरूनीचा पाठलाग करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंदः —**

दिनांक ०५/०७/०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादी ही टयुशनला जात असता, तिचा पाटलाग करून तिला थांबवुन 'तु मला धोका दिला' असे म्हणुन तिला थापडबुक्यांनी मारहान करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५४ ड(१),(एफ), ५०६,३२३,३४१ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) ट्रॅक्टरच्या धडकेत एक जखमी :—**

दिनांक ०५/०७/२०१८ चे १४.०० वाजता दरम्यान यातील हा त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६/८३४७ ने रस्ता ओंलाडत असतांनी डिव्हायडर जवळ मोटार सायकल थांबवीला असता, यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने हयगयीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकलला धडक मारून ओढत नेवुन फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी पुर्णेश चरणदास अवचट वय २८ वर्ष रा. दिघोरी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) संगनमत करून बिना पास परवाना बळजबरीने रेती भरलेला ट्रॅक्टर घेवुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक ५/०७/२०१८ चे १२.०० ते १४.१५ वाजता यातील आरोपीतांनी संगनमत करून त्याचे बिना नंबरचे ट्रॅक्टरमध्ये चोरी केलेली रेती १ ट्रॉली कि. २,०००/रु. ची भरून बिना रॉयल्टीने अडवुन कायदेशीर कार्यवाही करीत असतांना, आरोपीतांनी जबरदस्तीने ट्रॅक्टर नेत असताना फिर्यादी व त्याचे सहकार्याला हाताबुक्यानी मारपीट करून बळजबरीने ट्रॅक्टर घेवुन पळुन गेल्याने सरतर्फे फिर्यादी वासुदेव उपराडे वय ४१ वर्ष रा. विनोबानगर तुमसर तलाठी कोथुर्णा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९,३५३,३३२,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४)शिवीगाळ करून कुऱ्हाडीने मारून जखमी करून पाहुण घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : —**

दिनांक ०५/०७/२०१८ चे १२.०० ते १२.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा गावच्या दुकानात चहा पिण्यास गेला असता यातील आरोपीने तेथे पत्ते खेळत असलेल्या लोकांना तेथे पत्ते का खेळता असे म्हणुन हटकले असता फिर्यादीने आरोपी यास 'कुणालाही काही बोलु नको' असे हटकले असता फिर्यादीस शिवीगाळ करून कु—हाडीने डावे हाताचे अंगठयावर, मनघटावर, पाठीवर डाव्या बाजुला मारून जखमी केले व पाहुण घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादी अनिल अभिमन वरठे वय ४५ वर्ष रा. कवलेवाडा यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नान्हे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

५) इसमाचा मृत्यु : —

दिनांक ०५/०७/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील मृतक धनराज बाजीराव टेकाम वय ४० वर्ष रा. दिघोरी हा श्यामकला कंपनी कारधा येथे पावसामुळे पाय घसरून छातीचे भारावर पडल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रूग्नालय भंडारा येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी दरीयाव तुकाराम ऊईके वय ५६ वर्ष रा. दिघोरी यांचे तोंडी रिपोर्ट व डॉ. मेमो वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**६) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०५/०७/२०१८ चे १५.२० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो वाहन ही बस स्टॉप समोर साकाली येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. निंबार्ते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निंबार्ते पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

**७) अवैध देशी दारू /जुगार अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक ०५/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, सिहोरा, लाखनी व लाखांदुर येथे अवैध देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी किमती ३,०००/रु. व ३६ लिटर देशी दारू + मारोती ओमणी १,७८,०००/रु. तसेच जुगारातुन किमती १,९७५/रु असा एकुण किंमती १,८२,९७५/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०५/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०९ तीन सिटर वाहनाकरीता— ०८ ईतर वाहनांवरती — १२८ केसेस करण्यात आले आहे.

**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिती कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.